REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# आदिवासी संघटनांची धर्म विषयक भुमिका एक चिकित्सक अभ्यास...

श्री. सुकेंद्र किसनराव वळवी[१] , प्रा.डॉ. अनिल माणिक बैसाणे[२]
[१]संशोधन विदयार्थी ,प्राथमिक शिक्षकजिल्हा परिषद केंद्र शाळा, बसरावळ ता.साक्री जि.धुळे.
[2]एम.ए., सेट, पीएच. डी., जयहिंद शेक्षणिक संस्थेचे झुलाल भिलाजीराव पाटील कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे

## प्रस्तावना



भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) नुसार अनुसूचित जमातीमध्ये सर्व साधारण डोंगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या व आधुनिक संस्कृती आणि जीवन पध्दतीपासून अलिप्त राहणाऱ्या जमातींचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश आहे. आदिवासी संघटनांमार्फत समाजामध्ये सण-उत्सव, पारंपारीक पध्दती, प्रथा-परंपरेत नवीन आणि समाजातील अंधश्रध्दा हयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येते.

सन २०२१ च्या जनगनणे मध्ये आदिवासी धर्म कोड किंवा कॉलमची निर्मीती करावी अशी मागणी भारतातील आदिवासी संघटनेकडून करण्यात आली होती. तर नंदुरबार जिल्हयातील आदिवासी संघटनांनी सातपुडा हिंदू मेळाव्यास तीव्र निषेध केला होता. संघटनेच्या जाणीव जागृतीमुळे आदिवासी समाजात अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य खूप मोठया प्रमाणात होत आहे.




**( नंदुरबार जिल्हातील संघटनेचे पदधिंकारी )** संपूर्ण नंदुरबार धुळे जिल्हयात होत असल्यास धार्मिक व सामाजिक कार्यक्रमा संदर्भात वैज्ञानिक व चिकित्सक दृष्टींने अभ्यास करीत आहे. संघटने मार्फत अश्या स्वंयघोषीत माता आणि महाराज हयांना आदिवासी समूहाने बळी पडू नये म्हणून प्रबोधन करण्यात येत आहे.

## हिंदू मेळाव्याच्या प्रचार पत्रकावर आदिवासी देवी देवता प्रतिमा लावण्यास विरोध :

दिनांक १४, १५ जानेवारी २०१६ रोजी नंदुरबार येथे होणाऱ्या सातपुडा हिंदू मेळाव्याच्या भिंती पत्रकावर याहामोगी माता, बिरसामुंडा, तंटया भिल, खाज्या नाईक, गुलाम महाराज हया आदिवासी देवी देवतांची प्रतिमा लावण्यात आल्या होत्या. आदिवासींना हिंदू कोड बिल लागू नाही. आदिवासी संत व क्रांतीवीर यांना हिंदू गृहीत धरुन त्यांचा प्रचार पत्रकात वापर करण्यात आला व अशी प्रचार / पत्रके, भिंती पत्रके जिल्हयाभरात लावण्यात आली. सातपुडा हिंदू मेळाव्याच्या

कार्यक्रमामुळे दिनांक १४ आणि १५ जानेवारीला होणाऱ्या आदिवासी एकता संमेलनास आदिवासी बांधवाना जाणीव पुर्वक रोखण्यासाठी सातपुडया हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले, प्रतिमा लावल्याने आदिवासी समाजाच्या भावना दुखावण्यात आल्या आहेत. हया कारणामुळे जिल्हयाभरातील आदिवासी संघटनांनी सातपुडा हिंदू मेळाव्याचे तीव्र निषेध केला होता.[1] नंदुरबार जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रदिप पी. हयांना हया संदर्भात लेखी निवेदन अखिल भारतीय आदिवासी महासंघाचे अध्यक्ष डॉ. भरत वळवी, आदिवासी एकता परिषदेचे आप वाहारुभाउ सोनवणे, डोंगऱ्यादेव माऊली संघर्ष समितीचे श्री. राजेंद्र पवार, भिलीस्तान टायगर सेनेच्या श्रीमती मालती वळवी, कोकणा कोकणी महासंघाचे कमलेश अहिरे यांनी जिल्हाधिकारींना निवेदना द्वारे निषेध केले होते हया मेळाव्यास आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचा पाठींबा होता जिल्हयाभरात आदिवासींना आकर्षित करण्यासाठी हिंदू संघटनांनमार्फत आदिवासी क्रांतिकारक देवी देवता यांचा वापर करण्यात येतो असे संघटनेचे मत आहे.[2] हया संदर्भात निषेध म्हणून आदिवासी महासंघाचे सुहास नाईक, बी. ई. वसावे, मुळ निवासी मुक्ती मंचाचे प्राध्यापक भिमसिंग वळवी, माजी सभापती सी. के. पाडवी, आमश्या पाडवी, शिक्षक संघटनेचे मांगीलाल वळवी, यांच्यासह असंख्य संख्येने मोर्चा काढून तिव्र निषेध नोंदविला होता.

## आदिवासी संघटनाकडून वेगळा धर्म कोडची मागणी :-

आदिवासींचे रितीरिवाज, परंपरा, या इतरांपासून वेगळया असुन त्यांच्या स्वतंत्र धार्मिक संकल्पना स्वतंत्रपणे अस्तित्वात आहेत. इंग्रज काळापासून आदिवासींना स्वतंत्र ठेवण्यात आलेले आहे. आदिवासींना हिंदू कोड भिल्ल लागू नाही. तरी काही हिंदू संघटना कडून आदिवासी हिंदू आहेत असे म्हटले जाते. आदिवासी समूदायासाठी सन २०२१ च्या जनगनणे मध्ये आदिवासी धर्म कोड किंवा कॉलमची निर्मीती करावी अशी मागणी भारतातील आदिवासी संघटनेकडून करण्यात आली.




विनायक तुमराम, प्रल्हाद शिडाम महाराष्ट्र, लालूभाई वसावा गुजरात, डॉ. पुरुषोत्तम मिना, कार्तिक भिल्ल, राजस्थान, देवकुमारधान झारखंड, अरविंद ऊराँव रांची, राजकुमार कुंत्राम बिहार, काशिनाथ शहा दिल्ली, धीरज भगत पश्चिम बंगाल, मेहेरबान बर्डे मध्यप्रदेश, नेहरु मडावी आंध्रप्रदेश, घनश्याम नेताम ओरीसा, या राज्यातील आदिवासी संघटनांच्या प्रमुखांनी संघटने मार्फत शासन दरबारी आदिवासी धर्मकोड साठी मागणी मांडलेली आढळते.[3] आदिवासी संघटनेचे डॉ. पुरुषोत्तम मिना यांच्या मतानुसार स्वतंत्र्य पूर्व काळात आदिवासींना ज्याधर्म कोड मध्ये समावेश केलेला होता तोच धर्मकोड त्यांना पुन्हा देण्यात यावा आदिवासींना कधी ट्रायबल म्हटले गेले, कधी ॲमीनीस्ट, तर कधी अबोरीजीनल म्हटले गेले परंतू इंग्रज काळात ज्या धर्मात आमची गणना केली जात होती तोच धर्म कोड मध्ये आम्हाला समावेश करण्यात यावे प्रशासनाकडे आदिवासींच्या धर्म कोड देण्यास अनुसरुन वेगवेगळे आवेदनपत्र किंवा मागण्या होत आहे परंतू त्या चुकीच्या मार्गदर्शनानुसार होत आहे ५ व्या आणि ६ व्या अनुसूचि मध्ये देखील आदिवासींच्या रुढी परंपरास अनुसरुन मुद्दा दिलेला आहे. तरी देखील आदिवासींना जबरदस्ती हिंदू बनविले जात आहे. या संदर्भात तत्कालीन भाजप सरकार आदिवासी संघटनांवर दबाव बनवत आहे तसे न करता बहुसंख्यकांची मागणी लक्षात घेऊन आणि आदिवासी समूहासंबंधी

सविंधानातील तरतूदीस अनुसरुन आदिवासी समूहाला वेगळा कोड देण्यात यावा असे मत संघटनेच्या प्रतिनीधीकडुन म्हणून दिल्लीतील जंतर मंतर या ठिकाणी आंदोलना दरम्यान व्यक्त केलेले होते.[४]

### स्वंय:घोषीत देवी व त्यांच्या मार्फत होणाऱ्या कार्यक्रमावर बंदी

आदिवासी समूहातील खेडयापाडयावर धार्मिक आचरण करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जास्त आढळुन येते. त्यांना माता किंवा देवी संबोधले जाते. अश्या धार्मिक स्त्रीया स्वत:ला देवी देवता समजून समाजामध्ये अफवा, अंधश्रध्दा, गैरसमज पसरवित असतात. अनेक वेळा नवसपूर्तीच्या कारणाखाली मोठया प्रमाणात आर्थिक लूट केली जाते. अश्या गोष्टींमार्फत आदिवासी समाजाची फसवणुक होत असते व स्वयं:घोषीत देवी आणि महाराज यांच्या भूलथापांना आदिवासी समूह बळी पडत असतो. साक्री तालुक्यातील नवापाडा या गावातील अश्याच स्वंय:घोषीत देवीचा कार्यक्रम आदिवासी एकता परिषद, आदिवासी बचाव अभियान, बेधडक रोख ठोक आदिवासी संघ नंदुरबार यांनी पूर्णत: बंद केलेला आढळतो.[५] अश्या स्वंय:घोषीत देवी आणि महाराज यांचे प्रवचन आणि भाषण संघटनेतील सदस्यांमार्फत ओडीयो व्हिडीओ स्वरुपात जमा केले जातात. व त्याचा अंधश्रध्दा निर्मुलन समिती यांच्या मार्फत अभ्यास करुन व ठोस पुरावे मिळवून अश्या अंधश्रध्दा पसरविणाऱ्या, देवी देवतांचे नावाखाली चमत्काराच्या (हाथ चालाकीच्या) फसव्या गोष्टी करुन आदिवासी समूहात गैर समज व अंधश्रध्देला प्रोत्साहन देणाऱ्या घटना व व्यक्ती यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

नवापाडा गावातील स्वंय:घोषीत देवीचा कार्यक्रम बंद करण्यास अनुषगांने विनायक सावळे महाराष्ट्र राज्य, अंधश्रध्दा निर्मुलन समिती मुख्य सचिव, आप. कृष्णा कोकणी, पोलीस निरीक्षक, आप. प्राध्यापक अशोक बागुल महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान, आप. रावण चौरे आदिवासी बचाव समिती धनलाल ठाकरे, नवापाडा आप. कृष्णा गावीत विसरवाडी, आप. पंकज चौधरी या पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने स्वयं:घोषीत देवी, महाराज, माता हंयाचे कार्यक्रम बंद करण्यात येत आहे.[६] असे संघटनेच्या जाणीव जागृतीमुळे आदिवासी समाजात अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य खूप मोठया प्रमाणात होत आहे. असे कार्यक्रम संपूर्ण नंदुरबार धुळे जिल्हयात होत असल्याने वरील संघटना लक्ष ठेवून आहेत. अश्या कार्यक्रमांसदर्भात वैज्ञानिक व चिकित्सक दृष्टींकोनातुन अभ्यास केला जात आहे. व संघटने मार्फत अश्या स्वंय:घोषीत माता आणि महाराज हयांना आदिवासी समूहाने बळी पडू नये म्हणून प्रबोधन करण्यात येत आहे.

### समता एल्गार परिषद

नंदुरबार जिल्हयात दिनांक ४ एप्रिल २०१५ रोजी समत परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते समता परिषदेत आदिवासी समुहांना हिंदू कोड बिल लागू होत नाही. वारस, विवाह, घटस्फोट या बाबत आदिवासींना परंपरागत तोंडी कायदे लागू आहे. त्यांच्या स्वंतत्र पंचायतील मार्फत सामाजिक प्रश्न सोडविले जातात. त्यामुळे आदिवासी संस्कृती, परंपरा, रिती रिवाज यास अनुसरुन कायदा करण्यात यावा. जंगल, जल, जमीन आणि खनिजांचे सरंक्षण आदिवासींनीच केले आहे. आदिवासी समुहास जंगल, जल, जमिन खनिजासह सर्व नैसर्गिक साधन स्त्रोतासह अस्तित्वाच्या अधिकारास शासनाने मान्यता द्यावी जातीवादी धर्मांध शक्ती आदिवासींना वनवासी म्हणतात या मागे आदिवासीचे मुळ निवासी अस्तित्व नाकारण्याचे कारस्थान आहे. आदिवासी समुहाबाबत तुच्छता दर्शविणे आणि आदिवासींना अवमानित करण्याचा हा कट आहे. वनवासी म्हणणे हा कायद्याने गुन्हा ठरावा असे ठराव या परिषदेत घेण्यात आले होते. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी भा. रि. प. बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. बाळासाहेब प्रकाश आंबेडकर होते हया कार्यक्रमास कॉ. किशोर ढमाले, वहारुभाउु सोनवणे, रामसिंग गावीत, द्वारकाबाई गांगुर्डे, रणजीत गावीत, आर. टी. गावीत इत्यादि आदिवासी संघटनांचे कार्यकर्ते उपसस्थित होते.[७]

### आदिवासी समाजातील सण-उत्सव, प्रथा-पंरपरा या संदर्भातील ठराव :-

धनाई पुनाई, झरणीपाडा येथे आदिवासी कोकणी समाजात साजरे होणारे सण उत्सव आणि प्रथा पंरपरा या संदर्भात आदिवासी शिक्षक संघटना नवापूर, आदिवासी जनजागृती मंच, आदिवासी रुढी पंरपरा, जनजागृती समिती, ऑल इंडीया आदिवासी इम्लोईज फेडरेशन, शीत माऊल शिक्षक संघटना कोकणी हिल नंदुरबार, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटना धुळे, आदिवासी कोकणी समाज संघटना नंदुरबार, संकल्प आदिवासी गृप निजामपूर या संघटनेतील कार्यकर्ते आणि समाजातील ज्येष्ठ समाज बांधव सरपंच पोलीस पाटील यांच्या संयुक्त बैठका घेण्यात येतात.

१. शितमाऊली संघटने मार्फत कोकणी समाजात साखरपुडा (कुंकू लावणे) हया कार्यक्रमात अवास्तव गर्दी टाळून फक्त मर्यादीतच लोकांना बोलवणे करावे, नवरदेवास नारळ, टोपी करणाऱ्यांची संख्या कमी करणे, फक्त सासरचे कुटुंब आणि सख्या भावांनाच नारळ टोपी करण्यात यावी हा कार्यक्रम घरगुती स्वरुपाचा करावा वधु मुलीची ओटी भरणाऱ्या

५ महिलांना दिल्या जाणाऱ्या साडया बंद करणे ही प्रथा श्रीमंतीची दर्शन घडवणारी आहे. त्यामुळे अश्या प्रथा बंद व्हाव्यात साखरपुडयाचा कार्यक्रम अत्यंत साध्या पध्दतीने घेऊन पैसे वाचविण्यात यावेत. असे ठराव घेण्यात आले आहेत.[८]

२. कपडे देणे घेणे लग्न आहेर, या प्रथा बंद करणे. सत्य नारायण (आदिवासी धार्मिक संस्कृतीचा भाग नाही पण आज सद्यास्थितीला धार्मिक बाब आहे), घरभरणी कार्यक्रम, विहीर बोअरवेल पुजन कार्यक्रम या प्रसंगी ब्राह्मण न बोलविता समाजातीलच पुंजारो, भगत यांच्याकडून धार्मिक विधीचे कार्यक्रम करुन घेणे असा ठराव करण्यात आले आहेत. हया प्रसंगी कपडे देणे घेण्याची प्रथा बंद करण्यात यावी असे सुचविण्यात येते.

३. पारंपारीक ढोल वाद्यांचा वापर लग्न समारंभात करण्यात यावा आधुनिक बॅंड पथकांच्या वापरामुळे युवा वर्ग बेधुंदपणे रात्री नाच गाने करीत आहे. यास्तव सदर बॅंड पाटर्यांना नंदुरबार जिल्हयात अनेक गावात बंदी करण्यात आलेली आहे. लग्न समारंभ हया कार्यक्रमास अनुसरुन दारु पाजण्याची प्रथा बंद करण्यात यावी यास्तव तरुण वर्ग व्यसनाधीन झालेला आढळतो म्हणून हया प्रथांवर संघटने मार्फत बंद करण्यासाठी प्रचार प्रसार केला जातो.

४. होळी प्रसंगास अनुसरुन अनेक वेळा फाग देण्या घेण्यावरुन वाद निर्माण होतो गैर नृत्य करणाऱ्या व्यक्तींनाच फाग देण्यात यावा रस्त्यावर दोर बांधून दगड ठेवून दादागिरी करुन फाग मागणाऱ्यांना काहीही देण्यात येवू नये असे ठराव घेण्यात येतात.[९]

५. आदिवासी समाजात मुलीला हुंडा दिला जातो परंतू बिगर आदिवासी समूहाच्या सानिध्यामुळे काही आदिवासी समुहात मुलाला हुंडा देण्याची प्रथा सुरु झालेली आढळते यास्तव गरज नसल्यास हुंडा घेऊच नये किंवा कमी घ्यावा किंवा संसार उपयोगी साहित्य खरेदी करावे असे सुचविण्यात येते.

६. आदिवासी संघटने मार्फत शिक्षण, आरोग्य, वृक्षा रोपण, विद्यार्थी मार्गदर्शन, सण उत्सवा दरम्यान अनावश्यक खर्च, व्यसनधीनता यावर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

७. नवापूर तालुक्यात आदिवासी रुढी पंरपरा जनजागृती समिती मार्फत शिर्वे, गांधीनगर, धनराट हया गावांमध्ये आदिवासी विवाह पध्दती त्यात होणारे बदल, धार्मिक रुढी परंपरा, नृत्य, देवी देवता, पुजन हया संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले होते हया प्रसंगी बाबुराव वसावे, नकुल गावीत, सुकेंद्र वळवी, प्रकाश गावीत, ईश्वर गावीत असे आदिवासी बांधव उपस्थित होते.

नंदुरबार जिल्हयातील चिपलीपाडा हया गावी आदिवासी संघटने मार्फत अश्या स्वरुपाचे धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक मार्गदर्शन आदिवासी समाजास करण्यात आले होते हया कारणास्तव सदर गावातील आदिवासी समुहाने विवाह कार्यात पारंपारीक आदिवासी नृत्य आणि वाद्य यांनाच अनुमती देण्यात यावी बॅंड पार्टीस बंदी घालण्यात आलेली होती.

## आदिवासी देज नियमन परिषद, मोलगी

नंदुरबार जिल्हयातील आदिवासी जमातीत वधु पक्षाला वधु मुल्य देण्याची प्रथा अस्तित्वात आहे त्यास देज देणे असे म्हणतात, समाज सुधारण्याच्या दृष्टीने आदिवासी समाजात असणाऱ्या प्रथा परंपरा हयात बदल होण्यास अनुसरुन समाज जागृती होणे आवश्यक समजून या परिषदेत आदिवासी विवाह देज ठराव २१ हजारापर्यंत सर्व गावांमध्ये लागू करावा असे ठराव घेण्यात आले होते. १८ वर्षाखालील विवाह हे बालविवाह ठरवून त्यावर बंदी आणावी लग्न हे आदिवासी जमातीतच व्हावेत, लग्न करतांना आदिवासी रुढी परंपरा जाती, रिती रिवाज प्रमाणेच करण्यात यावे आज सद्यास्थितीला बहुपत्नीत्व पध्दत यावर बंदी करण्यात यावी. ग्राम पातळीवर वधु पक्षास देज मुल्य देण्यासाठी समितीचे गठण करण्यात यावे. ग्राम पंचायतीवर विवाह नोंदणी करण्यात यावी आदिवासी विवाहात पारंपारीक ढोल वाद्य आणि इतर वाद्यांना प्राधान्य देण्यात यावे. बॅंन्ड पार्टी यावर बंदी करण्यात यावी इतर समाजात होणारी वर पक्षास हुंडा देण्याची प्रथा आपल्या समाजात येऊ नये यासाठी जागृत रहावे. आदिवासी पारंपारीक लग्नात आदिवासी पुजारी यांच्याकडूनच लग्नविधी करुन घ्यावी अश्या ठरावांवर सातपुडा आदिवासी युवक मंडळ मोलगी, आदिवासी देज नियमन परिषद या संघटने मार्फत ठराव करुन घेण्यात आले होते. या परिषदेत सी. के. पाडवी, झेलसिंग पावरा, नरेंद्र पाडवी, ॲड. सरदारसिंग वसावे असे समाजातील प्रतिनीधी उपस्थित होते.[१०]

सारांश : प्रस्तुत संशोधकाच्या मते आदिवासी समूहाने वेगळया धर्म कोडची मागणीस म्हणजे स्वतंत्र्य धर्माची घोषणाच केलेली आहे. परंतू आज सद्यास्थीतीला आदिवासी समूह सन १९५१ च्या जनगनणेमध्ये हिंदू धर्मात समावेश केल्यामुळे बहुतांशी आदिवासी समूहाचा धर्म हिंदू समजत आहे. आणि सद्यास्थीतीला वेगवेगळया कारणास्तव आदिवासी समूहाचे ख्रिश्चन आणि मुस्लिम या धर्मामध्ये धर्मांतरण होत आहे. तरी देखील बहुतेक आदिवासी समूह त्याचा पारंपारीक निसर्ग धर्माचे पालन करतांना दिसत आहे. आदिवासींचा धर्म निसर्ग प्रेरीत असून कोणीही त्याची स्थापना केलेली नाही

अश्या धर्माला उत्पत्ती व अंत नाही म्हणून संघटनेच्या मागणीस अनुसरुन आदिवासी समुहास वेगळा धर्मकोड देण्यात यावा असे संशोधकाचे मत आहे. संशोधकाच्या मते आदिवासी समूहातील शिक्षीत वर्गा मार्फत संघटनेच्या माध्यमातून समाजातील श्रध्दा अंधश्रध्दा, प्रथा, परंपरा हया समाज हितांच्या आहेत का ? हे तपासुन अनिष्ठ रुढी-परंपरा संघटनेच्या माध्यमातून ठराव करुन त्याचे उच्चाटन करण्यात येत आहे. आदिवासी समूह हिंदू धर्मातील वर्ण व्यवस्थेचा भाग नसल्यामुळे व इतिहासात अनार्य म्हणून आदिवासींना किंवा येथील मुळ निवासीं सोबत सामाजिक भेद केल्यामुळे व चालीरीती परंपरा हया हिंदू धर्मापासून वेगळया असल्यामुळे आदिवासी संघटनांमार्फत हिंदू ठरवले जाणे हयास विरोध होत आहे. तर ख्रिस्ती धर्म प्रचार प्रसारासंदर्भात देखील संघटना जागृत असून प्रथा, परंपरा हया जोपासल्या जाव्यात. हयासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

## संदर्भ


१. दैनिक लोकमत नंदुरबार पुरवणी दिनांक १०.०१.२०१६ पृ. क्रं ४

२. तत्रैव

३. youtube video भारतातील आदिवासी संघटना जंतरमंतर कार्यक्रम

४. आदिवासी संघटना सभा व प्रचार पत्रक

५. http:// बेधडक रोख ठोक आदिवासी. कॉम

६. बेधडक रोख ठोक आदिवासी फेसबुक प्रोफाईल

७. दैनिक लोकमत नंदुरबार पुरवणी दिनांक ०५.०४.२०१५ पृ.क्र. ३

८. आदिवासी संघटना सभा ठराव ऑल इंडीया आदिवासी इम्लोईज फेडरेशन,शीत माऊल शिक्षक संघटना कोकणी हिल नंदुरबार,

९. आदिवासी रुढी पंरपरा जनजागृती समिती सभा, शिर्वे, नवापूर

१०. दैनिक लोकमत हॅलो नंदुरबार दि. ०४.०६.२०१५ पृ.क्र. ३